महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
पहिला मजला, २५-मर्झबान रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र .०२२-२२०१३६१७ Email ID: sangita.more90@gov.in

---

**क्रमांक : झेडपीए-२०२१/प्र.क्र.४५/वित्त-९,** **दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२१.**

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
नागपूर.

विषय:- जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकास कामांच्या ई-निविदाबाबत मार्गदर्शन करण्याबाबत.

संदर्भ: (१) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९, दि.२५ मार्च, २०१५
(२) ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९, दि.२३ फेब्रुवारी, २०१८
(३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.निविदा-२०१४/प्र.क्र.७८/बांधकाम-४, दि.२७ मे, २०२१
(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८
(५) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका (PWD Manual)
(६) आपल्या कार्यालयाचे पत्र दि.११/६/२०२१
(७) अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर यांचे दि.२८/१०/२०२१ चे निवेदन.

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्रास अनुसरुन जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १२३ तसेच पीडब्ल्यूडी मॅन्युअल मधील कलम १८९ मधील तरतुदीनुसार Departmental कामासाठी कोणतीही वित्तीय मर्यादेचे बंधन नाही, असा स्पष्ट उल्लेख असल्याने ग्रामपंचायतींना रु.१५ लक्ष रक्कमेपर्यंतची स्वनिधीतील कामे विभागीय पध्दतीने (Departmentaly) करता येतील. सबब आपल्या संदर्भ क्र.६ येथील पत्रात सूचित करण्यात आलेले, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचेमार्फत आवंटीत

...२/-

करण्यात आलेली कामे ग्रामपंचायतीने Departmental पध्दतीने करणे त्याचबरोबर ग्रामपंचायतींना केंद्र वा राज्य शासन निधीतून (जनसुविधा, नागरी सुविधा, १५ वा वित्त आयोगांतर्गत निधी वगैरे) प्राप्त होणा-या निधीतून रु.१५ लक्ष रक्कमेपर्यंतची कामे ही विना ई-निविदा पध्दतीने देखील करता येतील, असे कळविण्याचे मला निर्देश आहेत.

आपला,

(वसंत जाधवर)
उप संचालक (वित्त),महाराष्ट्र शासन.